दिनविशेष

२८ एप्रिल

**अंतरराष्ट्रीय**

१९५२ – अमेरिकेने जपानचा ताबा सोडला.
२००७ – नेपाळमध्ये ३३ वकीलांचे अपहरण करण्यात आले.

**राष्ट्रीय**

२००६ – आंध्र प्रदेशमध्ये कडाप्पा जिल्ह्यात पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत ७ माओवादी ठार झाले.

**जन्म**

१४४२ – एडवर्ड चौथा, ईंग्लंडचा राजा.

निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

# दैनिक निशस्त्र योध्दा

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | मंगळवार । २८ एप्रिल २०२६ । वर्ष–पहिले । अंक क्र. ४१ । पृष्ठे–४ । किंमत–४ रू. बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

# राज्यभर उष्णतेचा कहर

## पुढील दोन दिवसांत आणखी वाढीचा अंदाज

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या उन्हाचा प्रचंड तडाखा जाणवत असून राज्यभर तापमानाने अक्षरश: उच्चांक गाठला आहे. मराठवाडा, विदर्भासह अनेक भागांमध्ये उष्णतेचा पारा सातत्याने वाढत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून अनेक ठिकाणी अघोषित संचारबंदी असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषत: विदर्भातील अकोला शहरात या मोसमातील सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत तापमान ४६ अंशांपर्यंत जाण्याचा इशारा दिल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे.

अकोल्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून तापमान सातत्याने वाढत आहे. २१ एप्रिलला ४३.६ अंश, २२ एप्रिलला ४३.७ अंश, २३ एप्रिलला ४४.३ अंश, २४ एप्रिलला ४५ अंश तर २५ एप्रिलला तब्बल ४५.६ अंश तापमान नोंदवले गेले. या वाढत्या तापमानामुळे अकोला हे सध्या जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या शहरांपैकी एक ठरत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, परभणीत उष्माघातामुळे एका ३७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. शिवाजी बबन कांबळे असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव असून दिवसभर उन्हात फिरल्यानंतर त्यांना चक्कर आली आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे आणि उष्णतेच्या तीव्रतेची गंभीरता अधोरेखित झाली आहे.

जळगाव शहरातही तापमान ४३ अंशांच्या पुढे गेल्याने प्रशासनाने उपाययोजना सुरू केल्या आहेत. शहरातील प्रमुख चौकांमध्ये टँकरद्वारे पाणी मारण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. वाढत्या उकाड्यामुळे नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी ही उपाययोजना करण्यात येत आहे. पुण्यात देखील तापमानाने ४० अंशांचा टप्पा ओलांडला असून गेल्या आठवड्याभरापासून उष्णतेची तीव्रता कायम आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी



पुणेकर विविध थंड पेयांचा आस्वाद घेताना दिसत आहेत. विशेषत: उसाचा रस हा आयुर्वेदिकदृष्ट्या फायदेशीर मानला जात असल्याने त्याला मोठी मागणी आहे.

लातूर जिल्ह्यातही तापमानाचा पारा वाढत असून अनेक ठिकाणी ४२ अंशांपर्यंत तापमान पोहोचले आहे. दुपारी एक ते चार या वेळेत नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले आहे. निलंगा तालुक्यातील औराद–शहाजनी येथे सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. धुळे शहरात ४४ अंश तापमानाची नोंद झाली असून उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. वाढत्या उकाड्यामुळे नेहमी गजबजलेले रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमान आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. बुलढाणा शहरात तब्बल ६८ वर्षांनंतर तापमानाने ४३ अंशांचा टप्पा गाठला आहे. पूर्वी थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाणारे बुलढाणा आता उष्णतेच्या झळा सहन करत आहे. यापूर्वी १९५४ आणि १९५८ मध्ये ४२.२ अंश तापमानाची नोंद झाली होती, मात्र यंदा त्याहून अधिक तापमान नोंदले गेले आहे.

मुंबईतही एप्रिल महिन्यातच तापमान ३९ अंशांपर्यंत पोहोचले आहे. हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिल्यानंतर मुंबईकरांनी दुपारच्या वेळेत घरातच राहणे पसंत केले आहे.

दरम्यान, वाढत्या उष्णतेमुळे देशभरात विजेच्या मागणीतही विक्रमी वाढ झाली आहे. एप्रिल महिन्यात विजेच्या मागणीने २४० गिगावॅटचा टप्पा गाठला. गेल्या वर्षी जून महिन्यात विजेची सर्वाधिक मागणी २४२.७७ गिगावॅट इतकी नोंदवली गेली. वाढती उष्णता आणि एप्रिल महिन्यापासूनच सुरू झालेल्या हीटवेव्हमुळे देशभरात विजेच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे.

उन्हाळी हंगामातली आतापर्यंतही ही सर्वोच्च पातळी आहे. कमाल तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्यादरम्यान असल्याने आणि उष्णतेच्या लाटांचा प्रभाव असल्यामुळे एसी, कुलर्स आणि पंख्यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कृषी क्षेत्रात पंप संचांचा वापर वाढल्यामुळेही विजेचा खप वाढला आहे. उन्हाळ्यात विजेची सर्वाधिक मागणी अंदाजे २७० गिगावॅटपर्यंत पोहोचू शकते असा अंदाज विद्युत विभागाने वर्तवला आहे.

## Short न्यूज

### विमानाचे इमर्जन्सी लँडिंग; १६६ प्रवाशांचे प्राण थोडक्यात वाचले

**मुंबई :** विमान अपघाताच्या अनेक घटना या समोर येत आहेत. अहमदाबादची एक भयंकर मोठी विमान दुर्घटनेच्या आठवणी आजही ताज्या आहेत. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमधून अशाच एक अपघाताची बातमी समोर आली आहे. मुंबई ते भोपाळकडे जाणारे एअर इंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला अनब १७५ प्रवाशांचे प्राण टांगणीला लागला. मुंबईतून भोपाळच्या दिशेने निघालेले एअर इंडिया अ१६३ विमानाचे भोपाळमध्ये इमरजन्सी लँडिंग करण्यात आले. मुंबईकडून विमानाने उड्डाण घेताच काही वेळातच तांत्रिक बिघाड लक्षात आला. विमानात एकूण १७५ जण होते यात १६६ प्रवेशाचा समावेश होता. घटनेची माहिती मिळताच सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी त्वरित दाखल झाल्या. एटीसी, ग्राउंड स्टाफ, सीआयएसएफ आणि अग्निशमन दलाचे जवान घटनस्थळी पोहोचले होते, सर्वांनी आपली काम चोख बजावत, सर्व स्थिती सांभाळून घेतल्याने मोठा अपघात टळला आहे. एअर इंडियाच्या जाहीर केलेल्या माहितीनुसार विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे संकेत मिळाल्यानंतर पायलटने अंतर्गत निर्णय घेत. याच वेळेत पायलटने योग्य वेळेत अतिशय योग्य निर्णय घेतल्याने १७५ प्रवाशांचे प्राण वाचले. पायलट आणि ट्रॅफिक कंट्रोलसोबत योग्य समन्वय साधल्याने मोठी दुर्घटना टळली.

### पंतप्रधान मोदींवर हल्ल्याचे आडाखे बांधून काँग्रेसची देशद्रोही मानसिकता उघडी पडली!



**ठाणे :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा संदर्भ देत भारतातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला होऊ शकतो, असे वक्तव्य करून काँग्रेसने भीतीचे राजकारण सुरू केले आहे, असा आरोप करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संताप व्यक्त केला.

सोमवारी ठाणे येथे खरीप हंगाम बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे यांनी काँग्रेसवर जोरदार प्रहार करत म्हटले की, अशा प्रकारची भाषा ही केवळ निंदनीय नाही, तर देशाच्या प्रतिमेला धक्का देणारी आहे. ट्रम्प आणि अमेरिकेची तुलना भारताशी किंवा मोदींसारख्या जागतिक नेत्याशी करणे म्हणजे काँग्रेसच्या विचारांची दिवाळखोरी असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

शिंदे पुढे म्हणाले की, मोदींच्या नेतृत्वाखाली देश वेगाने आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करत आहे, शेतकरी सशक्त होत आहेत आणि महिलांना आत्मनिर्भरतेसह सन्मानाचे जीवन मिळत आहे. महिला आरक्षण विधेयकासारखे ऐतिहासिक निर्णय घेण्याची हिंमत मोदी सरकारने दाखवली, तर ते विधेयक इंडि आघाडीने पाडले. भीती पसरवून राजकारण करणे ही काँग्रेसची जुनी सवय असल्याचा आरोप करत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, १४० कोटी भारतीय जनता मोदींसोबत ठामपणे उभी आहे आणि योग्य वेळी काँग्रेसला धडा शिकवेल.




# बोगस बियाणे ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार : कृषी मंत्री भरणे

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**पुणे :** ''बियाणे उत्पादक कंपन्या व विक्रेते यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापुर्ण बियाणे उपल्बध करुन द्यावेत, या खरीप हंगामापासून पहिल्यांदाच बोगस बियाणे ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार आहे.तसेच बियाणे कायदा व बियाणे नियंत्रण आदेशांचे काटेकोर पालन करावे. अन्यथा शेतकऱ्यांच्या हितासाठी बनावट व निकृष्ट बियाणे उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला. तसेच बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी 'साथी' पोर्टलचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, बियाणे



उत्पादक ते शेतकरी या संपूर्ण प्रक्रियेत बियाण्यांची नोंद डिजिटल साखळीच्या स्वरूपात करण्यात येणार आहे. शेतकरी हित हेच सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. आज पुणे येथे शासकीय कृषी महाविद्यालयाच्या डॉ.शिरनामे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांच्या खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.या कार्यशाळेत आगामी हंगामासाठीची पूर्वतयारी, बियाण्यांचे नियोजन, उपलब्धता व वितरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यंदा संभाव्य एल निनो पार्श्वभूमीवर पाण्याचा ताण सहन करणारे व कमी कालावधीतील वाढणारे वाण उपलब्ध करुन द्यावेत. तसेच जिल्हानिहाय पीक नियोजन मजबूत करुन जर पेरणी ऊशीरा झाली तर पर्यायी पीक नियोजन तयार करा अशा सुचनाही कृषी मंर्त्यांनी विभागाला दिल्या. याप्रसंगी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद महासंचालक राहुल रंजन महिवाल,संचालक रफिक नाईकवाडी, संचालक सुनिल बोरकर, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पुढे बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली खरीप हंगाम २०२६ यशस्वी करण्यात येईल. गुणवत्तापूर्ण बियाण्यांमुळे उत्पादनात साधारणत: १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते, हे लक्षात घेता प्रमाणित व दर्जेदार बियाण्यांची शंभर टक्के उपलब्धता असल्याची खात्री करणं आवश्यक आहे. राज्यात यंदा १४५.२० लाख हेक्टर पेरणी क्षेत्र अपेक्षित असून, त्यानुसार पिकनिहाय बियाण्यांची गरज निश्चित करण्यात आली आहे.

## नवीन शांतता प्रस्तावात अणुविषयावर नंतर चर्चा करण्याचा इराणचा प्रस्ताव

**तेहरान :** इराणने युद्ध संपवण्यासाठी आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी अमेरिकेला एक नवीन प्रस्ताव सादर केलाय. या प्रस्तावात इराणने अणुविषयावर नंतर चर्चा करण्याचं सुचवलंय. हा नवीन प्रस्ताव पाकिस्तानच्या मध्यस्थीने वॉशिंग्टनला सादर करण्यात आलाय. या सामरिक जलमार्गातील संकट आणि अमेरिकेच्या नौदल नाकेबंदीचे निराकरण करण्यावर यात लक्ष केंद्रित केलंय.

माध्यमांच्या वृत्तानुसार, इराणने अमेरिकेला पाठवलेल्या नवीन कराराचा उद्देश होमुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडणे हा आहे. ही सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे जागतिक ऊर्जा संकट अधिक गडद झालंय. नवीन करारानुसार, युद्धविराम अधिक कालावधीसाठी वाढवला जाणार आहे किंवा तेहरान आणि वॉशिंग्टन कायमस्वरूपी शत्रुत्व संपवण्यास सहमत होतील. ॲक्सिऑसच्या वृत्तानुसार, अणुचर्चा नंतरच्या टप्प्यात जोडली जाणार आहे. सामुद्रधुनी उघडणे आणि इराणी बंदरांवरील अमेरिकेची नौदल नाकेबंदी उठवणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडतील. वृत्तानुसार, व्हाईट हाऊसला हा प्रस्ताव मिळाला आहे. ट्रम्प प्रशासन या नवीन करारावर विचार करेल की नाही हे अस्पष्ट आहे. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या ऑलिव्हिया वेल्स यांनी 'ॲक्सिऑस'ला सांगितले की, अमेरिका अशा ''संवेदनशील राजनैतिक'' मुद्द्यांवर माध्यमांद्वारे चर्चा करणार नाही.

अमेरिकेने म्हटले आहे की, वाटाघाटी करण्याचा अधिकार अमेरिका राखून ठेवते आणि केवळ अशाच कराराचा पाठपुरावा करेल, जो अमेरिकन लोकांना प्राधान्य देईल आणि इराणला अणुशस्त्रे मिळवण्यापासून कायमचे रोखेल. शांतता चर्चेच्या नवीन फेरीसाठी ट्रम्प यांनी आपल्या दूताचा पाकिस्तान दौरा रद्द केल्यानंतर काही दिवसांतच हा नवीन प्रस्ताव आलाय. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची पाकिस्तान सोडून गेल्यानंतर अमेरिकन अधिकाऱ्यांनी विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांचा इस्लामाबाद दौरा रद्द केला.

# वृक्षतोडीचा धडाका जोमात; वन विभाग मात्र सुस्त!

## मादनी–आरेगाव परिसरातून लाकडाची बिनधास्त वाहतूक; रक्षकच बनले भक्षक?

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**डोणगाव :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एकीकडे झाडे लावा, झाडे जगवा असा नारा दिला जात असताना, दुसरीकडे मादनी मार्गे आरेगाव आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरू असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, भरदिवसा ट्रॅक्टर भरून लाकडांची तस्करी होत असतानाही वन विभाग मात्र याकडे पूर्णपणे डोळेझाक करत असल्याची संतप्त भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मादनी आणि आरेगाव परिसरातील शेतातून मौल्यवान झाडांची कत्तल केली जात आहे. ही तोडलेली लाकडे ट्रॅक्टरच्या साहाय्याने ढवळा, देवसा आणि इतर ठिकाणी बिनधास्तपणे वाहून नेली जात आहेत. रस्त्यावरून लाकडाने गच्च भरलेले ट्रॅक्टर जात असतानाही, वन विभागाच्या वतीने कोणतीही अडवणूक किंवा कारवाई होताना दिसत नाही. वन विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह जंगलाचे संरक्षण करण्याची जबाबदारी ज्या विभागावर आहे, तो वन विभाग या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष का करत आहे? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.



ही वृक्षतोड बिनधास्तपणे सुरू असल्यामुळे यात वन विभागाचे अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचे अभय तर नाही ना, अशी शंका नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास

अवैध वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडत असून वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. जर ही वृक्षतोड अशीच सुरू राहिली, तर भविष्यात या परिसरातील हिरवळ पूर्णपणे नष्ट होण्याची भीती वर्तवली जात आहे. आता या प्रकरणी वरिष्ठ अधिकारी दखल घेऊन संबंधित दोषींवर आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आपच्या खासदारांच्या विलिनीकरणाला राज्यसभेच्या सभापतींची मंजुरी

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांच्यासह सात खासदारांनी भाजपाची वाट धरल्यानं मोठी खळबळ उडाली. या सात खासदारांच्या विलिनीकरणाला राज्यसभेचे सभापती सी पी राधाकृष्णन यांनी मंजुरी दिली. याबाबतचं वृत्त पीटीआय या एजन्सीनं दिलं आहे. यामुळे राज्यसभेतील भाजपाचं संख्याबळ वाढून ११३ झालं आहे, तर आपचं संख्याबळ घटून तीनवर आलं आहे.

२४ एप्रिल रोजी आपला मोठा धक्का बसला. आपचे खासदार राघव चड्ढा, अशोक मित्तल, संदीप पाठक, हरभजन सिंग, राजेंद्र गुप्ता, विक्रम साहनी आणि स्वाती मालीवाल यांनी पक्ष सोडून भाजपामध्ये प्रवेश केला. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आप पक्ष आपली तत्त्वं, मूल्यं आणि नैतिकतेपासून भरकटला आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला. विशेष म्हणजे, पक्ष सोडून गेलेल्या या सात खासदारांपैकी सहा खासदार पंजाबमधून राज्यसभेवर निवडून आलेले आहेत. रविवारी आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी सांगितलं की, ''पक्षानं संविधानाच्या दहाव्या अनुसूचीअंतर्गत याचिका दाखल केली आहे. राज्यसभेच्या सभापतींकडं यावर त्वरित सुनावणी घेऊन निष्पक्ष निर्णय देण्याची या याचिकेत विनंती केली आहे. याप्रकरणी आपनं ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि लोकसभेचे माजी महासचिव यांच्यासह अनेक घटना तज्ज्ञांचा सल्ला घेतला. या तज्ज्ञांनी ''कायद्यानुसार हे खासदार अपात्र ठरण्यास पात्र आहेत, असं सांगितलं''



राघव चड्ढा यांनी सोमवारी सोशल माध्यमांवर एक व्हिडिओ जारी करून, आपण भाजपामध्ये प्रवेश का केला, याची कारणं स्पष्ट केली. या व्हिडिओमध्ये राघव चड्ढा यांनी ''आपलं उत्तम करियर सोडून मी केवळ स्वतःची कारकीर्द घडवण्यासाठी राजकारणात आलो नव्हतो. त्यामुळे आपण अरविंद केजरीवाल यांची साथ सोडली कारण हा आता तो जुना पक्ष राहिलेला नाही. पक्षात आता निर्माण झालं. त्यामुळे आपल्याला काम करण्यापासून रोखलं जात होतं,'' असा आरोप त्यांनी केला. ''गेल्या तीन दिवसांपासून तुम्ही मला अनेक संदेश पाठवत आहात. त्यातील बहुतांश संदेशांत तुम्ही माझं अभिनंदन करत आहात. परंतु काहींना माझ्या या निर्णयामागील कारणं जाणून घ्यायची आहेत. आजचा हा व्हिडिओ त्यांच्यासाठी आणि ज्यांनी माझी पत्रकार परिषद पाहिली नाही, त्यांच्यासाठी आहे,'' असं स्पष्ट केलं. दरम्यान खासदार राघव चड्ढा यांना केंद्रीय मंत्रिपद देण्यात येणार असल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे.

# वाढती उष्णता आणि आरोग्यावर धोका हीट स्ट्रोकपासून बचाव आवश्यक

सध्या देशासह राज्यात अकोला जिल्ह्यातील तापमान सर्वाधिक असल्याने चिंता वाढली आहे. अकोल्यातील पातूर तालुक्यातही सूर्याने जणू अंगातील आग ओकण्यास सुरुवात केली आहे. पातूरमध्ये सकाळी ११ वाजल्यापासूनच रस्ते, वसाहती आणि चौकांमध्ये शांतता दिसून येत आहे. लोक दिवसभर घरात पंखे, कूलर आणि एसीच्या सहाय्याने आराम करताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्याबाबतही धोका निर्माण झाला आहे. तीव्र सूर्यकिरणांनी जणू ज्वालामुखीचे रूप धारण केले आहे.

उष्णता आणि सतत वाढणारे तापमान हे आता केवळ हंगामी त्रास राहिले नसून सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या बनत आहे. दरवर्षी उन्हाळ्यात लू (हीट स्ट्रोक) आणि उष्णतेशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढताना दिसते. लहान मुले, वृद्ध, मजूर, शेतकरी तसेच मधुमेह, हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांमध्ये याचा धोका अधिक असतो. वेळेवर ओळख आणि योग्य उपचार न मिळाल्यास ही स्थिती गंभीर आणि कधी कधी जीवघेणी ठरू शकते.

या तीव्र उष्णतेच्या लाटेबाबत आमच्या प्रतिनिधींनी डॉ. उमैर सुफियान



यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मते, हीट वेव म्हणजे तापमान सामान्यपेक्षा खूप जास्त वाढणे आणि अनेक दिवस सतत तीव्र उष्णता टिकून राहणे. अशा वेळी शरीरावर उष्णतेचा परिणाम अधिक वाढतो आणि डिहायड्रेशन, हीट एक्सॉशन व हीट स्ट्रोकचा धोका वाढतो.

**उष्णतेचा शरीरावर परिणाम**

- शरीर घामाद्वारे स्वतःला थंड ठेवते (थर्मोरेग्युलेशन)
- जास्त उष्णता व आर्द्रतेमध्ये ही प्रक्रिया नीट कार्य करत नाही
- अधिक घामामुळे डिहायड्रेशन व इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता (सोडियम, पोटॅशियम)
- रक्ताभिसरणावर परिणाम होऊन हृदयावर ताण येतो
- चक्कर येणे, डोकेदुखी, अशक्तपणा, थकवा अशी लक्षणे दिसतात
- शरीराचे तापमान धोकादायक पातळीपर्यंत वाढू शकते

**लू आणि उष्णतेशी संबंधित आजार**

- सुरुवातीला हीट क्रॅम्प्स (सोडियमच्या कमतरतेमुळे)
- नंतर हीट एक्सॉशन (अशक्तपणा, चक्कर, उलटी, वेगवान ठोके, घाम)
- दुर्लक्ष केल्यास हीट स्ट्रोकमध्ये रूपांतर
- शरीराचे तापमान ४० किंवा त्याहून अधिक होते

**लक्षणे:** तीव्र ताप, कोरडी गरम त्वचा, गोंधळ, बेशुद्धी, झटके

- मेंदू, मूत्रपिंड व हृदयावर गंभीर परिणाम

**तात्काळ काय करावे**

**(प्राथमिक उपचार)**

- रुग्णाला लगेच थंड किंवा सावलीच्या ठिकाणी न्यावे
- कपडे सैल करावेत, शरीर थंड करावे (पाणी, ओले कापड, पंखा)
- शुद्धीत असल्यास ओआरएस किंवा पाणी द्यावे
- बेशुद्ध व्यक्तीला तोंडाने काही देऊ नये
- आवश्यक असल्यास रुग्णालयात उपचार (सलाईन, इलेक्ट्रोलाइट, आयसीएस )

**बचावाचे उपाय**

- तहान लागण्याची वाट न पाहता दर तासाला पाणी प्या
- दुपारी ११ ते ४ दरम्यान उन्हात जाणे टाळा
- हलके व सूती कपडे परिधान करा
- काळ्या कपड्यांचा वापर टाळा
- बाहेर पडताना पाण्याची बाटली व डोक्यावर आच्छादन ठेवा
- लक्षणे दिसल्यास त्वरित उपाययोजना करा
- दिवसभर पुरेसे पाणी प्या
- ओआरएस लिंबूपाणी, ताक, नारळपाणी यांचे सेवन करा
- उपाशीपोटी उन्हात जाऊ नका
- कॅफीन व अल्कोहोलचे सेवन कमी करा
- लहान मुले व वृद्धांची विशेष काळजी घ्या

**महत्त्वाचा संदेश**

उष्णतेला हलक्यात घेऊ नका. चक्कर, अशक्तपणा, गोंधळ किंवा बेशुद्धी यांसारखी लक्षणे दुर्लक्षित करू नका. अशी लक्षणे दिसल्यास त्वरित जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.



**डॉ. उमैर सुफियान (एम.बी.बी.एस., एम.डी. मेडिसिन)**

## भारताच्या ऊर्जा स्थैर्याला बळकटी देणारा दौरा

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मॉरिशस येथील नववी हिंद महासागर शिखर परिषद आटोपल्यानंतर लगेच दोन दिवसांचा अरब अमिरातीचा (यूएई) दौरा पूर्ण केला. त्यांच्या या दौऱ्याचा उद्देश भारतीयांची सुरक्षा तर होताच शिवाय कतार आणि यूएईसारख्या देशाकडून तेल व गॅसचा पुरवठा नियमित होण्यासाठी करावयाचे नियोजित प्रयत्न हा सुद्धा या भेटीमागचा एक दूरदृष्टीचा उद्देश होता. अखातामधील इराण-अमेरिका संघर्ष दोन आठवड्याकरता थांबला, पण पुढे अनिश्चिततेची टांगती तलवार अनेक प्रश्न निर्माण करत आहे. विशेषतः भारतासारख्या विशाल खंडप्राय आणि १४६ कोटी लोकसंख्या असलेल्या देशाला ऊर्जा संकटाला सामोरे जात असताना काही ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आखाती देशांशी सातत्याने संपर्क ठेवला आहे. हा संपर्क ठेवण्यामागे दोन हेतू आहेत. पहिले म्हणजे तेथे राहणाऱ्या भारतीयांची सुरक्षा जपणे आणि दुसरे म्हणजे आखातातील मित्र राष्ट्राकडून तेल व गॅसचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करणे, असा आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी दि. १२, १३ एप्रिल रोजी युनायटेड अरब अमिरातीचा दोन दिवसांचा दौरा पूर्ण केला. या दौऱ्यातून त्यांनी आखातामधील युद्धाच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक विकास, सामाजिक भागीदारी मजबूत करण्यासाठी रचनात्मक चर्चा केली. या दौऱ्यामध्ये त्यांनी ऊर्जा समस्येवरसुद्धा लक्ष केंद्रित केले होते. मागील वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमिरातीच्या सम्राटाने भारत-यूएई दरम्यानचा व्यापार आगामी काही वर्षात दुप्पट करण्याच्या दृष्टीने संकल्प केला होता. व्यापार गुंतवणूक वाढ तसेच ऊर्जा समस्या आणि सुरक्षा धोरण सुनिश्चिती तसेच परदेशस्थ भारतीयांच्या समुदायाचे कल्याण इत्यादी पैलूंवर त्यांनी या दौऱ्यात चर्चा केली तसेच प्रामुख्याने प्रादेशिक सुरक्षा आणि अन्य आव्हानांना सामोरे जात असताना दोन्ही नेत्यांनी उच्चस्तरीय चर्चा करून मार्ग शोधले तसेच अध्यक्ष शेख मोहम्मद बिन जायद अल नहयान यांची एक विशेष भेटही घेतली व त्यांना पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचा संदेश देण्यात आला. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या यूएई दौऱ्याची फलश्रुती काय असेल, तर प्रामुख्याने पश्चिम आशियात शांतता व स्थैर्य गतिमान करण्यासाठी भारत यांच्या प्रभावी भूमिकांचे गतिवर्धन करण्यात आलेले यश होय. प्रामुख्याने सामाजिक आणि प्रादेशिक सुरक्षेबाबत दोन्ही परराष्ट्रमंत्र्यांनी विचारविनिमय केला. अमेरिका-इराण युद्ध विरामानंतर प्रादेशिक स्थैर्याबाबत चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये प्रामुख्याने ऊर्जापुरवठा साखळी मजबूत करणे आणि आंतरराष्ट्रीय जहाज वाहतूक सुरक्षित करणे या दोन पैलूंवर भर देण्यात आला होता. ऊर्जापुरवठा साखळी मजबूत करणे आणि आंतरराष्ट्रीय जहाज वाहतुकीला चालना देणे, या विषयावर सुद्धा दोन्ही नेत्यांमध्ये विधायक चर्चा घडून आली. गतवर्षी भारताने २० बिलियन डॉलर्स तेलाची आयात दुबईकडून केली होती. आता यावर्षी सुद्धा ही आयात वाढणार आहे. त्यामुळे भारतीयांच्या तेलविषयक गरजा गतीने पूर्ण होऊ शकतील. या दौऱ्यात परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी यूएईच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा करताना द्वीपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यावर विशेषत्वाने चर्चा घडवून आली. व्यापार आणि तंत्रज्ञान तसेच ऊर्जा समस्या, कामगारांचे कल्याण इत्यादींबाबतीत सहकार्य अधिक मजबूत करण्यावर दोन्ही बाजूंनी विशेष प्रकाश टाकण्यात आला. असे करताना सर्वसमावेशक सामरिक भागीदारी विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांचा यूएई दौरा हा भारत आणि युनायटेड अरब अमिरात यांच्यातील द्वीपक्षीय सहकार्यावर भर देणारा मैलाचा दगड ठरला आहे. त्यांनी ४० लाख भारतीय प्रजेच्या सुरक्षेच्या आणि कल्याणाच्या प्रश्नांवर तेथील राज्यकर्त्यांशी चर्चा केली तसेच दुबईतील हिंदू मंदिराला भेट देऊन तेथील कामगारांशीसुद्धा त्यांनी विविध प्रश्नांवर चर्चा केली. स्थानिक भारतीय नागरिकांच्या शिष्टमंडळाबरोबर आणि प्रमुख नेत्यांबरोबर चर्चा करताना त्यांनी त्यांचे प्रश्न समजावून घेतले व ते मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्नही केले आहेत. द्वीपक्षीय सहकार्याच्या बाबतीत पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी आणि एसएमबी यांच्या समवेत यापूर्वी नवी दिल्लीत झालेल्या चर्चेच्या आधारे पुढील मार्गक्रमण करण्यासाठी ऊर्जा, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, संस्कृती, पर्यटन यांसारख्या क्षेत्रात दोन्ही देशांना कसे पुढे जाता येईल, यावरही विचार करण्यात आला आहे. दोन्ही संबंधांचा विचार करता व्यापार आणि गुंतवणूक दुप्पट करणे, हा एक महत्त्वाचा बिंदू आहे. त्या दृष्टीने सर्वसमावेशक व्यापार उदीम तसेच दोन्ही देशांच्या सुरक्षिततेसाठी सामरिक भागीदारी प्रशिक्षण पुढे नेण्यावर चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने सर्वसमावेशक सामरिक भागीदारी हा सुद्धा एक महत्त्वाचा चर्चेचा बिंदू होता. त्यापलीकडे जाऊन भारतीय डायओस्पोराचे कल्याण या अनुषंगाने सुद्धा डॉ. एस. जयशंकर यांनी भारतीय समुदायातील नेत्यांची भेट घेतली आणि अलीकडील तणावाच्या काळातील भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत त्यांनी विचारविनिमय केला. स्थानिक प्रशासनाने भारतीयांना दिलेला पाठिंबा आणि दाखवलेली सहानुभूती याबाबतीत पंतप्रधान मोदींच्या वतीने त्यांनी संयुक्त अरब अमिरातीचे विशेष आभार मानले आहेत. राजकीय संपर्क हा दोन्ही देशात मजबूत संबंधाचा कणा असतो तसेच हा संपर्क म्हणजे दोन्ही देशातील मजबूत संबंधांचा आत्मा आहे, हे लक्षात घेऊन मंत्र्यांनी यूएईच्या नेत्यांची भेट घेतली आणि पश्चिम आशियातील शांतता प्रश्नांबाबत बोलणी केली. सामुदायिक संवादाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्यांनी तेथील स्थानिक हिंदू मंदिराच्या बांधकाम स्थळाला भेट दिली आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या भावना समजावून घेतल्या. आखातातील सर्व देशांमध्ये यूएई हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे तसेच सामरिक दृष्टीने सुद्धा आता सहकार्याला नवी दिशा प्राप्त होत आहे. सध्या तरी भारताच्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्याचे श्रेय या कुशल नेत्याकडे जाते. त्यांनी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली केलेली ही कामगिरी सामान्य भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच स्पृहणीय आणि मोलाची आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या मॉरिशस दौऱ्यातील ही भेट चार दिवसांच्या दौऱ्यातील अंतिम टप्पा होती. त्यामध्ये त्यांनी अरब अमिरातीचे अध्यक्ष तसेच उपपंतप्रधान परराष्ट्रमंत्री यांच्याबरोबर चर्चा करून अखंड ऊर्जा पुरवठ्याबाबत बोलणी केली. जयशंकर यांचा दुबई दौरा निर्णायक आणि सकारात्मक फलश्रुती देणारा ठरला आहे. त्यांच्या या दौऱ्यामुळे कतारकडून भारताला कच्चे तेल, पेट्रोलियम पदार्थ आणि एलपीजी यांचा पुरवठा उत्तम प्रकारे होईल, याची ग्वाही मिळाली आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जाविषयक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा दौरा खरोखरच निर्णायक वळण देणारा म्हटला पाहिजे.

# जनतेच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक क्षेत्राला लोकसंख्येच्या प्रमाणात बळ द्या, मगच प्रतिनिधित्वाच्या वाढीला अर्थ येईल

लोकशाही ही केवळ मतदानाची पद्धत नसून ती जनतेच्या जीवनमानाशी जोडलेली व्यवस्था आहे. लोकशाहीचा खरा अर्थ असा की, प्रत्येक नागरिकाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, रोजगार, न्याय आणि प्रशासन यांचा समान हक्क मिळाला पाहिजे. परंतु आज देशात एक विचित्र परिस्थिती निर्माण होताना दिसते. लोकसंख्या वाढली की सर्वप्रथम चर्चा होते ती आमदार आणि खासदारांच्या जागा वाढविण्याची. पण त्याच वेळी लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा वाढल्या का, शिक्षक वाढले का, दवाखाने वाढले का, डॉक्टर वाढले का, नोकऱ्या वाढल्या का, पोलीस वाढले का, प्रशासनातील कर्मचारी वाढले का या प्रश्नांची उत्तरे मात्र समाधानकारक नाहीत. म्हणूनच सामान्य नागरिक विचारतो की, जर लोकसंख्येच्या प्रमाणात सुविधा वाढत नसतील, तर फक्त लोकसंख्येच्या प्रमाणात आमदार आणि खासदार का पाहिजेत?

देशात लोकसंख्या वाढत आहे, शहरे विस्तारत आहेत, नवीन वस्त्या निर्माण होत आहेत, ग्रामीण भागातही लोकसंख्या घनता वाढत आहे. या बदलानुसार शासनाने मूलभूत सुविधा वाढवणे अपेक्षित असते. कारण नागरिकांच्या गरजा बदलतात. मुलांची संख्या वाढली तर शाळांची गरज वाढते. आजारी लोकसंख्या वाढली तर दवाखाने वाढवावे लागतात. तरुणांची संख्या वाढली तर रोजगार निर्माण करावा लागतो. वाहतूक वाढली तर रस्ते व सार्वजनिक व्यवस्था मजबूत करावी लागते. गुन्हेगारी नियंत्रणासाठी पोलीस दल सक्षम करावे लागते. पण प्रत्यक्षात अनेक ठिकाणी उलट चित्र दिसते. लोकसंख्या वाढते, पण सुविधा तशाच राहतात. त्यामुळे ताण, असंतोष आणि असमानता वाढते. सर्वप्रथम शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर अनेक गावांमध्ये अजूनही पुरेशा शाळा नाहीत. काही ठिकाणी प्राथमिक शाळा आहे पण माध्यमिक शाळा नाही. मुलांना शिक्षणासाठी दूरवर जावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना याचा विशेष त्रास सहन करावा लागतो. शहरांमध्ये शाळा आहेत, पण वर्गखोल्या कमी, विद्यार्थ्यांची गर्दी जास्त, मैदान नाही, प्रयोगशाळा नाही, संगणक सुविधा अपुऱ्या अशी परिस्थिती आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन शाळा सुरू झाल्या असत्या तर शिक्षणाचा दर्जा उंचावला असता. परंतु प्रत्यक्षात अनेक शाळा एकत्र केल्या जातात, बंद केल्या जातात किंवा संसाधनांच्या अभावात चालतात. मग फक्त मतदारसंघ वाढविण्याची चर्चा का? विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षकांची संख्या हा आणखी गंभीर विषय आहे.

हजारो शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. काही शाळांमध्ये एक शिक्षक तीन-चार वर्ग सांभाळतो. मुख्याध्यापकांकडे अध्यापनासोबत प्रशासनाची जबाबदारी असते. विज्ञान, गणित, इंग्रजी यांसारख्या विषयांचे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यायचे असेल तर विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर योग्य असणे आवश्यक आहे. पण ते जपले जात नाही. शिक्षक भरती रखडते, तात्पुरत्या नियुक्त्या होतात, बदल्यांचा प्रश्न कायम राहतो. मग विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक नकोत, पण लोकसंख्येच्या प्रमाणात आमदार हवेत, हे कसे न्याय्य ठरेल? आरोग्य क्षेत्रात तर परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. अनेक ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे कागदावर आहेत, पण डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत, तपासणी साधने नाहीत. उपजिल्हा रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांचा अभाव आहे. जिल्हा रुग्णालयांवर प्रचंड ताण आहे. शहरांमध्ये मोठी रुग्णालये आहेत, पण गर्दी एवढी असते की रुग्णांना तासन्‌तास प्रतीक्षा करावी लागते. काही वेळा खाट मिळत नाही, तपासण्या महाग असतात, शस्त्रक्रियेसाठी प्रतीक्षा यादी असते. लोकसंख्या वाढली तशी दवाखाने, आरोग्य केंद्रे, रुग्णालये आणि आधुनिक सुविधा वाढायला हव्या होत्या. पण तसे झाले नाही. मग आरोग्यापेक्षा प्रतिनिधी वाढविणे अधिक महत्त्वाचे का मानले जाते? डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी यांची संख्या देखील लोकसंख्येच्या तुलनेत अपुरी आहे. सरकारी सेवेत डॉक्टर टिकत नाहीत, ग्रामीण सेवेसाठी प्रोत्साहन कमी आहे, नर्सेस आणि तंत्रज्ञांची कमतरता आहे. एका डॉक्टरवर शेकडो रुग्णांची जबाबदारी येते. आरोग्य सेवेत माणसांचा थकवा वाढतो आणि नागरिकांचा विश्वास कमी होतो. जर लोकसंख्येच्या प्रमाणात डॉक्टर वाढवले गेले असते तर अनेक जीव वाचले असते, आजार लवकर ओळखले गेले असते, आरोग्य व्यवस्था सक्षम झाली असती. पण या विषयांवर गंभीर चर्चा कमी आणि जागा वाढविण्यावर भर जास्त दिसतो. रोजगार हा तरुणाईच्या भवितव्याचा कणा आहे. देशात मोठ्या प्रमाणावर तरुण लोकसंख्या आहे. हीच लोकसंख्या योग्य दिशेने वापरली तर राष्ट्रशक्ती बनते. पण बेरोजगारी वाढली तर तीच लोकसंख्या असंतोषाचे कारण ठरते. अनेक तरुण स्पर्धा परीक्षा देतात, पण भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे प्रलंबित राहते. काही भरती परीक्षा रद्द होतात, काही न्यायालयात अडकतात, काही ठिकाणी रिक्त पदे असूनही भरती होत नाही. उद्योगधंदे सर्वत्र समान प्रमाणात वाढलेले नाहीत. ग्रामीण भागातील युवक शहरांकडे स्थलांतर करतात. कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योग सहाय्य अपुरे आहे. मग लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या नाहीत, पण लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी हवेत, हे तरुणांना पटेल का? सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस दल अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकसंख्या वाढली की वाहतूक वाढते, वाद वाढतात, गुन्ह्यांचे प्रकार बदलतात, सायबर गुन्हे वाढतात, महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न वाढतात. या सर्वांसाठी प्रशिक्षित, आधुनिक आणि पुरेशा संख्येतील पोलीस दल आवश्यक आहे. पण अनेक पोलीस ठाण्यांमध्ये मनुष्यबळ कमी आहे. एका कर्मचाऱ्यावर चौकशी, बंदोबस्त, गस्त, कागदपत्रे, न्यायालयीन कामे अशा अनेक जबाबदाऱ्या असतात. पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासांबाबतही प्रश्न आहेत. जर लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस दल वाढवले गेले नाही तर कायदा-सुव्यवस्था कशी राखली जाणार? मग या क्षेत्राला प्राधान्य का नाही? इतर शासकीय विभागांची स्थितीही वेगळी नाही. महसूल कार्यालयात कर्मचारी कमी, ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक कर्मचारी कमी, कृषी विभागात मार्गदर्शन कमी, समाजकल्याण विभागात प्रकरणे प्रलंबित, न्यायव्यवस्थेत कर्मचारी अपुरे, परिवहन व्यवस्थेत तुटवडा अशी अनेक उदाहरणे आहेत. सामान्य नागरिकाला जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, नकाशा मंजुरी, जमीन नोंद, अनुदान, पेन्शन, शिष्यवृत्ती अशा कामांसाठी वारंवार कार्यालयात जावे लागते. कारण कामाचा ताण जास्त आणि कर्मचारी कमी. जर लोकसंख्येच्या प्रमाणात प्रशासन मजबूत केले असते तर नागरिकांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाचला असता. मग फक्त आमदार आणि खासदारांच्या जागांचा मुद्दा का पुढे येतो? यामागे काही तर्क दिले जातात. लोकसंख्या वाढली की मतदारसंघ मोठे होतात, प्रतिनिधीला सर्व भागांपर्यंत पोहोचणे कठीण जाते, जनतेचे प्रश्न अधिक होतात. हे काही प्रमाणात खरे आहे. पण याचबरोबर दुसरा प्रश्न असा आहे की, विद्यमान प्रतिनिधींची कार्यक्षमता, उत्तरदायित्व, उपस्थिती, निधीचा वापर, जनसंपर्क, धोरणात्मक कामगिरी याचे मूल्यमापन किती होते? संख्या वाढविण्यापूर्वी गुणवत्तेचा विचार व्हायला हवा. अधिक आमदार-खासदार म्हणजे लोकशाही मजबूत होईलच असे नाही. जर तेच राजकारण, तेच पक्षनिष्ठेचे खेळ, तेच विकासाऐवजी आरोप-प्रत्यारोप, तेच अपूर्ण आश्वासने आणि तेच भ्रष्टाचार चालू राहिला, तर संख्या वाढवून जनतेला काय फायदा? लोकशाहीची ताकद केवळ जागांमध्ये नसते; ती प्रामाणिकतेत, पारदर्शकतेत आणि जनहिताच्या निर्णयांत असते. आज अनेक मतदारसंघांमध्ये जनतेची तक्रार आहे की निवडणुकीपूर्वी नेते घरोघरी येतात, पण निवडून आल्यानंतर पाच वर्षे दिसत नाहीत. काही ठिकाणी निधी अपुरा वापरला जातो, काही ठिकाणी स्थानिक प्रश्न कायम राहतात. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, शेती, उद्योग यावर सातत्याने काम करणारे प्रतिनिधी कमी दिसतात. मग आधी विद्यमान यंत्रणा कार्यक्षम करा, नंतर जागा वाढविण्याचा विचार करा, असे नागरिक म्हणतात. लोकशाहीत प्रतिनिधित्व महत्त्वाचे असले तरी नागरिकांचे जीवनमान त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. एका कुटुंबाला त्यांच्या भागात चांगली शाळा, चांगला दवाखाना, सुरक्षित रस्ता, रोजगाराची संधी, वेळेवर शासकीय सेवा आणि न्याय मिळणे आवश्यक आहे. या गोष्टी नसतील तर संसदेत किंवा विधानसभेत जागा वाढल्या तरी सामान्य माणसाच्या जीवनात काय बदल होणार? ग्रामीण भारताचा विचार केला तर अजूनही अनेक गावांमध्ये पाणीटंचाई, शेतीचे प्रश्न, आरोग्य सुविधांचा अभाव, इंटरनेटची कमतरता, वाहतुकीची अडचण, रोजगाराचा अभाव आहे. शहरांमध्ये महागाई, घरांची समस्या, वाहतूक कोंडी, प्रदूषण, नोकरीतील अस्थिरता आणि ताण आहे. या सर्व प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी सक्षम शासन हवे. केवळ प्रतिनिधी संख्या वाढवून हे प्रश्न सुटत नाहीत. शासनाने जर खरोखर लोकसंख्येचा विचार करायचा असेल तर प्रत्येक क्षेत्रासाठी मानके ठरवावीत. किती लोकसंख्येमागे किती शाळा, किती शिक्षक, किती रुग्णालये, किती डॉक्टर, किती पोलीस, किती प्रशासकीय कर्मचारी, किती रोजगार संधी, किती सार्वजनिक वाहतूक सुविधा असाव्यात याचा आराखडा हवा. त्यावर वेळबद्ध अंमलबजावणी हवी. तेव्हाच लोकसंख्या हा शब्द जनतेच्या हिताचा ठरेल. तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून शासन सेवा सुलभ करणे आवश्यक आहे. ऑनलाईन सेवा, पारदर्शक भरती, डिजिटल आरोग्य नोंदी, स्मार्ट शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, उद्योग प्रोत्साहन, पोलीस आधुनिकीकरण, न्यायालयीन गती हे विषयही लोकसंख्येइतकेच महत्त्वाचे आहेत. आजचा मतदार पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहे. तो केवळ घोषणांवर विश्वास ठेवत नाही. तो विचारतो माझ्या मुलाच्या शिक्षणासाठी काय केले? माझ्या गावात डॉक्टर का नाही? माझ्या मुलाला नोकरी कधी मिळणार? रस्ता का नाही? पाणी का नाही? सरकारी कामासाठी चकरा का माराव्या लागतात? हे प्रश्न अनुत्तरित ठेवून जागा वाढविण्याची भाषा केली तर लोकांचा संशय वाढतो. म्हणूनच लोकशाहीचा खरा मार्ग असा असला पाहिजे प्रथम नागरिकांच्या गरजा पूर्ण करा, नंतर राजकीय रचना वाढवा. प्रथम सुविधा, नंतर विस्तार. प्रथम गुणवत्ता, नंतर संख्या. प्रथम सेवा, नंतर सत्ता. जर देशाला सक्षम करायचे असेल तर प्रत्येक मुलाला शिक्षण, प्रत्येक रुग्णाला उपचार, प्रत्येक तरुणाला संधी, प्रत्येक स्त्रीला सुरक्षा, प्रत्येक शेतकऱ्याला आधार, प्रत्येक नागरिकाला सन्मान आणि वेळेवर प्रशासन द्या. मग प्रतिनिधी किती असावेत हा प्रश्न आपोआप सुटेल. लोकसंख्येच्या प्रमाणात फक्त आमदार-खासदार नकोत; लोकसंख्येच्या प्रमाणात संधी, सुविधा, न्याय आणि विकास हवा. तेव्हाच लोकशाही पूर्ण होईल. अन्यथा जनतेला आकडे मिळतील, पण जीवनमान सुधारणार नाही. म्हणून आज देशातील प्रत्येक नागरिकाने हा प्रश्न विचारायलाच हवा आम्हाला अधिक नेते हवेत की अधिक सुविधा? अधिक भाषणे हवीत की अधिक काम? अधिक जागा हव्यात की अधिक विकास? लोकशाही टिकवायची असेल तर उत्तर स्पष्ट आहे जनतेच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक क्षेत्राला लोकसंख्येच्या प्रमाणात बळ द्या. मगच प्रतिनिधित्वाच्या वाढीला अर्थ येईल. अन्यथा हा सर्व वाद फक्त राजकीय आकडेमोड ठरेल.



**शैलेश सपना सुबोधभाऊ सावजी**

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ॲक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

# लोणारमध्ये 'खगोल दर्शन महोत्सव २०२६'चा जल्लोष

## हजारोंची उपस्थिती; लोणार बनले ॲस्ट्रोटुरिझमचे नवे केंद्र







**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**लोणार:** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त तसेच आंतरराष्ट्रीय 'डार्क स्काय वीक'च्या पार्श्वभूमीवर लोणार येथे आयोजित 'खगोल दर्शन महोत्सव २०२६'ला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. दि. २४ ते २६ एप्रिल दरम्यान पार पडलेल्या या तीन दिवसीय महोत्सवात राज्यभरातून तसेच राज्याबाहेरील पर्यटक आणि खगोलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून लोणारच्या आकाशाखाली अवकाश निरीक्षणाचा अद्वितीय अनुभव घेतला.

लोणार येथील एमटीडीसी परिसरात पार पडलेल्या या महोत्सवाने पर्यटनाच्या दृष्टीने नवा मापदंड निर्माण केला. पहिल्याच दिवशी सुमारे ३०० ते ४०० नागरिकांनी उपस्थिती लावली, तर दुसऱ्या दिवशी हा आकडा ६०० ते ७०० पर्यंत पोहोचला. तिसऱ्या दिवशी तब्बल ७०० ते ८०० नागरिकांनी सहभाग घेत महोत्सवाला शिखरावर नेले. लोणारमध्ये दिवसेंदिवस वाढत गेलेली ही उपस्थिती महोत्सवाच्या लोकप्रियतेची साक्ष देणारी ठरली.

या महोत्सवात नागरिकांना दुर्बिणीतून चंद्र, गुरू आणि शुक्र या ग्रहांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची दुर्मिळ संधी मिळाली. काही वेळ ढगाळ वातावरणामुळे प्रतीक्षा करावी लागली, तरीही उपस्थितांनी संयम राखत अवकाश निरीक्षणाचा रोमांचक अनुभव घेतला. स्टारगेझिंग सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, माहितीपट व प्रदर्शन यांच्या माध्यमातून प्रकाश प्रदूषणाचे दुष्परिणाम, नैसर्गिक अंधाराचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धन याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली. हा उपक्रम एमटीडीसी, ॲस्ट्रॉनइरा आणि डार्क स्काय इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. ॲस्ट्रॉनइराच्या संस्थापिका श्वेता कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून हे विशेष सत्र साकारले गेले.

महोत्सवाच्या समारोप. चित्रध्वनी संभाषण कार्यक्रमात व्हर्च्युअल माध्यमातून पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, एमटीडीसीचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल तसेच पर्यटन तज्ज्ञ मृत्युंजय मिश्रा सहभागी झाले होते. त्यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत अशा कार्यक्रमांमुळे जनजागृतीसह पर्यटनाला चालना मिळत असल्याचे नमूद केले.

माजी नगरसेवक डॉ. अनिल मापारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''जागतिक वारसा स्थळ असलेल्या लोणारमध्ये खगोल दर्शनाचा अनुभव घेणे हा अत्यंत आनंददायी आहे. अशा उपक्रमांमुळे लोणारचे नाव देश-विदेशात पोहोचेल आणि ॲस्ट्रोटुरिझमला मोठी चालना मिळेल.'' दरम्यान, हरिहरेश्वर येथेही या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते; मात्र लोणारमधील प्रचंड प्रतिसादामुळे हे ठिकाण विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ, पर्यटक व खगोलप्रेमी यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. विशेष म्हणजे, इतर ठिकाणी शुल्क आकारले जाणारे आकाश निरीक्षण लोणारमध्ये नागरिकांना विनामूल्य अनुभवता आले, ही बाब विशेष ठरली.

## Short न्यूज

### भंगार साहित्याच्या गोदामाला आग; अग्निशमन दलाच्या तत्परतेने अनर्थ टळला

**खामगांव :** शेगाव रोड परिसरातील एका शाळेजवळ असलेल्या भंगार साहित्याच्या गोदामाला रविवारी (दि. २६) दुपारी अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत मोठ्या प्रमाणावर भंगार साहित्य जळून खाक झाले असून आर्थिक नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी भंगार साहित्य साठवून ठेवले होते. दुपारच्या सुमारास अचानक आग भडकली आणि काही वेळातच आगीने भीषण रूप धारण केले. परिसरात धुराचे लोट पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या चार गाड्यांनी शर्थीचे प्रयत्न करत काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. आगीमुळे गोदामातील बहुतांश भंगार साहित्य जळून खाक झाले असून आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, आग लागलेल्या ठिकाणाजवळ शाळा असल्याने भिंतींना काही प्रमाणात तडे गेले असून पाण्याच्या पाइपलाईनचेही नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### चीन, पाकिस्तानची झोपच उडणार; भारत आणि रशियामध्ये मोठा करार

**नवी दिल्ली :** भारत आणि रशिया या दोन देशांतील मैत्रीपूर्ण संबंध संपूर्ण जगाला माहित आहे. जगाचा विरोध धुडकावत कधी भारत रशियासाठी तर कधी रशिया भारतासाठी संकटाच्या काळात भक्कम उभा राहिला आहे. आखाती देशात सध्या तणाव आहे. होर्मुज खाडी इराण आणि अमेरिका युद्धामुळे बंद आहे. होर्मुज खाडी बंद असल्याने तेलाची समस्या आहे. जगात अनेक ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. अशातच रशिया आणि भारताने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने भारताच्या आजूबाजूच्या देशांची चांगलीच जळजळ होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारत आणि रशियाने एका मोठ्या संरक्षण करारावर सह्या केल्या. या कराराअंतर्गत रशिया भारताला लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे पुरवणार आहे. या कराराची अद्याप अधिकृत घोषणा झाली पण करार जवळपास झाला असल्याची माहिती आहे. या कराराला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. या करारामध्ये रशिया भारताला ठ-३७ शब क्षेपणास्त्र देणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारताला चीन आणि पाकिस्तानविरोधात लढण्यासाठी या क्षेत्रपास्त्राचा अत्यंत मोठा फायदा होऊ शकतो.

ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानमधून भारतावर मोठे बॉम्ब टाकले जात होते. यावेळी रशियन बनावटीचे क्षेपणास्त्र हवेतच पाकिस्तानचे हे बॉम्ब निकामी करत होते. भारताने ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारताची लष्करी ताकद जगाला दाखवली. रशियन माध्यमांनुसार, ठ-३७ शब हे सर्वाधिक पल्ल्याच्या हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांपैकी एक आहे. त्याचा वेग अंदाजे ३००-४०० किमी आहे.

या क्षेपणास्त्राचा वापर हवाई पूर्व सूचना आणि इंधनवाहू विमानांद्वारे, शत्रूच्या जेट विमानांना अत्यंत अचूकतेने टार्गेट करते. भारताची लष्करी ताकद मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. गेल्या काही दिवसांपासून रशिया आणि भारत मोठ्या प्रमाणात लष्करी करार करत आहेत. रशियाचे अध्यक्ष पुतिनदेखील भारत दौऱ्यावर लवकरच येणार आहेत.

### मरीन ड्राईव्हवर दुचाकींच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकासह तिघांचा मृत्यू

**मुंबई :** मरीन ड्राईव्ह परिसरात सोमवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात एका ज्येष्ठ नागरिकासह दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला. पहाटे पावणेसहा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिकाला भरधाव वेगानं येणाऱ्या दोन दुचाकींनी धडक दिल्यानं हा भीषण अपघात झाला. या घटनेनं मरीन ड्राईव्ह परिसरात एकच खळबळ उडाली.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, गिरगाव परिसरातील एक ज्येष्ठ नागरिक नेहमीप्रमाणे सकाळी फिरण्यासाठी मरीन ड्राईव्ह येथे आले होते. त्याचवेळी दोन दुचाकी भरधाव वेगानं रस्त्यावरून जात होत्या. या दोन्ही दुचाकींनी ज्येष्ठ नागरिकाला धडक दिली. धडकेनंतर दुचाकीवरील एक तरुण आणि एक तरुणीही रस्त्यावर फेकले गेले. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, दोन्ही बाईकचे चाक, सायलेन्सर आणि चेसिसचे काही भाग तुटून विखुरले.

घटनेची माहिती मिळताच मरीन ड्राईव्ह पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली. जखमींना त्वरित जीटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान तिघांचाही मृत्यू झाला. मृतांमध्ये एक ज्येष्ठ नागरिक, एक तरुण आणि एक तरुणी यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## शिकाऊ डॉक्टर अन् नर्सकडूनच उपचार, हलगर्जीपणामुळे चार महिन्यांच्या बाळाचा मृत्यू? आईचा आक्रोश, न्यायासाठी धडपड

**मुंबई :** सरकारी असो किंवा खासगी, अनेकदा रुग्णालय प्रशासनाकडून संवेदना हरवत असल्याचं पाहायला मिळत आहे. रुग्णालयात होत असलेला नातेवाईकांच्या आक्रोश आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुद्ध चीड आणि संतापाची भावनाही सातत्याने समोर येत आहे. मुंबईच्या वाडिया हॉस्पिटलमधील शिकाऊ डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका चार महिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप बाळाच्या आईने केलाय. याप्रकरणी डॉक्टरांवर कारवाईच्या मागणीसाठी बाळाच्या कुटुंबीयांनी १५ एप्रिलला भोईवाडा पोलिसांना तक्रारी अर्ज केला होता. विशेष म्हणजे, राष्ट्रपतींपासून ते पंतप्रधान, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, पोलीस आयुक्त अशा सर्वांकडे पत्रव्यवहार केला असून आपल्या बाळाला न्याय मिळावा, अशी त्यांची मागणी आहे.

## गौ माता सन्मान अभियान: वाशीम येथे भव्य जनजागरण रॅली



**दैनिक निशस्त्र योध्दा**

**वाशीम :** गौ मातेचे संरक्षण, संवर्धन आणि तिला राष्ट्रमाता असा सन्मानाचा दर्जा मिळवून देण्यासाठी दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी वाशीम शहरात एका भव्य जन-जागरण रॅली आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत धर्मप्रेमी, गो-भक्त आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद विविध मागण्यांसाठी तहसीलदारां मार्फत मुख्यमंत्र्यांना ११ हजार लोकांच्या स्वाक्षरींसह दिले निवेदन.

वाशीम शहरात दिनांक २७ एप्रिल रोजी गौ हत्या पुरपणे बंदी, गोशाळांचे संरक्षण व विकास, गौमातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्यात यावा या मागण्यांसाठी गौसन्मान रॅली आयोजित करण्यात आली होती. या जनजागरण रॅलीमध्ये शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठा सहभाग नोंदविला. रॅलीची सुरूवात वाशीम शहरातील बालाजी मंदिर येथुन करून छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्टँड मार्गे तहसील कार्यालय येथे नेण्यात आली.

तहसील कार्यालयात तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना रॅलीत सहभागी सर्वांच्या उपस्थितीत गौ हत्या पूर्णपणे बंदी, गोशाळांचे संरक्षण व विकास, गौमातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्यात यावा या मागण्यांसाठी ११ हजार लोकांच्या स्वाक्षरी असलेले निवेदन लाल कपड्यांमध्ये गुंडाळून ग्रंथ स्वरूप प्रार्थना पत्रासह तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

या जनजागरण रॅलीमध्ये शहरासह जिल्ह्यातील बालयोगी गोपाल नाथ बाबा, भोलेनाथ बाबा, श्याम सुंदर भारती महाराज, ह. भ. प. नामदेव महाराज काकडे, ह. भ. प. गजानन महाराज मापारी, ह. भ. प. जय महाराज सरनाईक, सिख समाज पुजारी भावसिंह पवार यांच्यासह वत्सगूल्म नगरीचे मान्यवर व नागरिकांनी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग नोंदविला.

## जिगाव प्रकल्पात ५० कोटींचे पाइप जळून खाक? सीआयडी चौकशीची मागणी

**दैनिक निशस्त्र योध्दा**



**डोणगांव :** जिगाव प्रकल्प परिसरात अंदाजे ५० कोटी रुपयांचे पाइप जळून भस्मसात झाल्याच्या गंभीर प्रकरणामुळे खळबळ उडाली असून या संपूर्ण घटनेची सीआयडीमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी माजी राज्यमंत्री तथा माजी आमदार सुबोधभाऊ सावजी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात जळालेल्या पाइप खरेदी प्रक्रियेपासून ते साठवणूक, सुरक्षा व्यवस्था, देखरेख आणि जबाबदारी निश्चितीपर्यंत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. निवेदनात म्हटले आहे की, ही घटना केवळ आर्थिक नुकसानीपुरती मर्यादित नसून सार्वजनिक निधी, शासकीय मालमत्ता आणि संबंधित विभागांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. पाइप कोणत्या खात्याअंतर्गत खरेदी करण्यात आले, त्यांची साठवणूक कोणाच्या देखरेखीखाली होती, सुरक्षा कोणाच्या जबाबदारीत होती, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणामागे निष्काळजीपणा, संगनमत किंवा मोठा भ्रष्टाचार असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून संबंधित उच्चस्तरीय अधिकारी व पदाधिकाऱ्यांची भूमिकाही तपासावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जनतेच्या करातून उभारण्यात आलेल्या निधीचा अपव्यय होणे ही गंभीर बाब असल्याने दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनामुळे जिगाव प्रकल्पातील पाइप जळीत प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## बिर्याणी खाल्ली अनब मग कलिंगड; एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू, मुंबईतील धक्कादायक घटना

**मुंबई :** दक्षिण मुंबईमधील पायधूनी परिसरातील एक धक्कादायक घटनेने हादरली आहे. एकाच कुटुंबातील चौघांचा विषबाधेमुळे मृत्यू झाला आहे. नवरा, बायको आणि दोन मुलींचा मृत्यू झाला आहे. अब्दुल्ला डोकाडिया (४०), नसरीन डोकाडिया (३५) आणि त्यांच्या मुली आयशा (१६) आणि झैनब (१३) अशी या चौघांची नावं आहेत. या चौघांनी रात्री आधी बिर्याणी खाल्ली त्यानंतर कलिंगड, त्याच्या काही तासांनंतर त्यांची प्रकृती खराब झाली. दुसऱ्या दिवशी त्या चौघांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

नेमकं त्या दिवशी काय घडलं?

मुंबईत या घटनेनंतर परिसरात भीतीदायक वातावरण आहे. डोकाडिया कुटुंब रविवारी सुट्टी असल्याने शनिवारी रात्री नातेवाईकांकडे गेले होते. तिथे त्यांनी रात्री १०.३० वाजता बिर्याणी खाल्ली. त्यानंतर साधारण रात्री १ ते १.३० च्या सुमारास कलिंगड खाल्ले. त्यानंतर त्या चौघांनाही उलट्या होऊ लागल्या. पोटात दुखू पण लागलं. उलट्यामुळे चक्कर यायला लागली. रविवारी त्या चौघांना अजून त्रास व्हायला लागला. त्या कुटुंबातील दोन्ही मुली बेशुद्धावस्थेत दिसल्या. मग शेजारच्यांनी त्या चौघांना तात्काळ जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात डॉक्टरांनी एका मुलीला मृत घोषित केलं. त्यानंतर काहीच तासांमध्ये दुसऱ्या मुलीचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दोन मुलींच्या मृत्यूनंतर पती पत्नींचाही काही वेळात मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच भीतीदायक वातावरण आहे. या मृत्यूमागे विषबाधा सांगितली जाते. पण कोणत्या पदार्थामुळे विषबाधा झाली हे शवविच्छेदन अहवालानंतर समोर आली आहे. अन्न नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे.

## येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी सज्ज रहा : भाऊसाहेब सरदार जिल्हाध्यक्ष

**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**मलकापुर:** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाची जिल्हा बैठक आज दि.२७ एप्रिल २६ रोजी संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्ष जिल्हा अध्यक्ष भाऊसाहेब सरदार होते तर प्रमुख उपस्थिती नीलकंठ सोनवणे जिल्हा महासचिव, संजय बोदळे विदर्भ उपाध्य,क्ष भास्कर शेगोकार जिल्हा संघटक, रोशनी ताई कबीरदास जिल्हा महिला अध्यक्ष, भास्कर भटकर जिल्हा उपाध्यक्ष, विलास गवांदे तालुकाध्यक्ष शेगाव, संतोष वानखेडे तालुका अध्यक्ष जळगाव जामोद, बाबूलाल इंगळे जिल्हा कार्याध्यक्ष, शैलेश वाकोडे नांदुरा तालुकाध्यक्ष, दिलीप इंगळे मलकापूर तालुका अध्यक्ष, मनोज धमेरीया खामगाव तालुका अध्यक्ष, जयपाल मोरे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख ,प्रकाश मेढे, जिल्हा उपाध्यक्ष गजानन वानखेडे यांची प्रमुख उपस्थित होती. कार्यक्रमांमध्ये भाऊसाहेब सरदार यांनी आपल्या मार्गदर्शनात येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीविषयी सर्व कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले.

डॉ. रामदास आठवले केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री यांची तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याने बुलढाणा जिल्ह्यामध्ये त्यांचा भव्य दिव्य सत्कार समारोचे आयोजन करायचे आहे या संबंधी चर्चा केली व पक्षामध्ये नवीन कार्यकर्त्यांना प्रवेश देऊन पक्ष संघटन मजबूत करण्याचे आव्हान केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास गवांदे



तालुकाध्यक्ष यांनी केले तर आभार संतोष वानखेडे यांनी मानले.

Short न्यूज

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातर्फे कार्यशाळेचे आयोजन

**बुलढाणा :** मातंग समाज तसेच तत्सम बारा पोटजातीतील वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय बुलढाणा (मर्या) यांच्या वतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार दि. ५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात येणार आहे.
सदर कार्यशाळेचा मुख्य उद्देश मातंग समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देणे, त्यांचा लाभ मिळवून देणे तसेच समाजाचे जीवनमान उंचावणे हा आहे. या कार्यशाळेत विविध योजनांबाबत मार्गदर्शन, शंका निरसन आणि लाभार्थ्यांसाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत माहिती दिली जाणार आहे. मातंग व मांग समाजातील नागरिकांनी वेळेत उपस्थित राहून या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक दि. शं. पाखमोडे यांनी केले आहे.

### आयपीएलच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अंगक्रिश रघुवंशीवर दंडात्मक कारवाई

**मुंबई:** कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यातील आयपीएल २०२६ च्या सामन्यानंतर, कोलकाता नाईट रायडर्सचा युवा फलंदाज अंगक्रिश रघुवंशीला साम न्यादरम्यानच्या त्याच्या आक्रमक वर्तनाबद्दल त्याच्या सामना शुल्काच्या २० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ''कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज आणि यष्टीरक्षक अंगक्रिश रघुवंशीला, सामना क्रमांक ३८ म ध्ये आचारसंहितेच्या लेव्हल १ उल्लंघनासाठी त्याच्या सामना शुल्काच्या २० टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे.'' त्यात पुढे म्हटले आहे की, त्याने कलम २.२ चे उल्लंघन केले, जे सामन्यादरम्यान उपकरणे किंवा मैदानातील साहित्याच्या गैरवापराशी संबंधित आहे. रघुवंशीने आपली चूक कबूल केली असून सामनाधिकाऱ्यांचा निर्णय स्वीकारला आहे. आयपीएलच्या नियमांनुसार, लेव्हल १ उल्लंघनासाठी सामनाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असतो. केकेआरने लखनौविरुद्धचा सामना सुपर ओव्हरमध्ये जिंकला, परंतु या विजयादरम्यान रघुवंशीचे वर्तन चर्चेचा विषय बनले. एका तरुण क्रिकेटपटूकडून अशा वर्तनाची अपेक्षा नसते आणि त्याचा संघाच्या प्रतिमेवरही परिणाम होतो. ही घटना सामन्याच्या पाचव्या षटकात घडली, जेव्हा रघुवंशीला क्षेत्ररक्षणात अडथळा आणल्याबद्दल बाद देण्यात आले. या निर्णयानंतर, त्याचा संताप अनावर झाला आणि रागाच्या भरात त्याने आपल्या बॅटने सीम रेषेवरील कुशनवर प्रहार केला.

### जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**जालना :** ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात संपन्न झाली.
यावेळी बैठकीस वैधमापनचे आर.डी. दराडे, महावितरणचे समाधान म्हस्के, एस.बी. मठपती, बीएसएनएलचे पी.एस. इंगळे, अन्न व औषध विभागाचे अश्विनी तांबे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नारायण पवार, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे राजकुमार मुंडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी ङ. एस. दिवटेयावेळी अप्पर जिल्हाधिकारी श्री. मिसाळ म्हणाले की, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारी त्वरित सोडविण्याचे आहे.

# देऊळगाव राजात गोमाता संरक्षणासाठी जनसागर उसळला; हजारोंच्या सहभागाने तहसीलवर विराट रॅली

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**देऊळगाव राजा :** देशभरातील विविध राज्यांमध्ये गोमाता व गोवंशाच्या कत्तलीविरोधात संतसमाजाने दिलेल्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत २७ एप्रिल २०२६ रोजी देऊळगाव राजा शहरात हजारोंच्या सहभागाने भव्य रॅली काढण्यात आली. शहर घोषणांनी दुमदुमून गेले असून गोमाता संरक्षणासाठी नागरिकांनी एकजूट दाखवली.
कार्यक्रमाची सुरुवात शहरातील श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात गोमाता व नंदी पूजनाने करण्यात आली. ह.भ.प. निकम गुरुजी, आमदार मनोज कायंदे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष माधुरी तुषार सिबने, डॉ. गणेश मांटे, माजी नगराध्यक्ष संतोष खांडेभराड, गोविंदराव झोरे आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन पार पडले.






यानंतर शहरातून विराट रॅली काढण्यात आली. ''गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा द्या'', ''गोहत्या बंद करा'', ''भारत माता की जय'', ''जय भवानी जय शिवाजी'', ''वंदे मातरम्'', ''जय श्रीराम'' अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला. रॅलीनंतर रेस्ट हाऊस मैदानावर तहसीलदारांना बोलावून सुमारे दहा हजार गोभक्तांच्या सह्यांचे निवेदन राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री व राज्यपाल यांना पाठविण्यासाठी सुपूर्द करण्यात आले.
यावेळी आमदार मनोज कायंदे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, माजी नगराध्यक्ष गोविंदराव झोरे व ॲड. अर्पित मीनासे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत गोसंवर्धनासाठी समाजाने पुढे यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुरज गुप्ता यांनी केले. या विराट रॅलीत शहरातील हजारो महिला–पुरुष, व्यापारी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.
व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून सहकार्य केल्याबद्दल देऊळगाव राजा गोसेवा समितीच्या वतीने सर्व व्यापाऱ्यांचे आभार मानण्यात आले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निलेश अग्रवाल, वनवे सर, गोविंदराव झोरे, मनीष कावरा, राजेश तायडे, भरत कुरे, संमती जैन, राजकुमार काबरा, संतोष तिडके, कृष्णा खरात, अविनाश भावसार, उमाजी झोरे, बिपिन मल्लावत, कुलकर्णी साहेब, राजे प्रताप जाधव, गोपाल व्यास आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# रसायनांनी आंबा पिकवल्यास थेट फौजदारी गुन्हा दाखल होणार!

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**बुलडाणा :** उन्हाळ्याच्या सुरुवातीपासूनच बाजारात आंबा, केळी, पपई, चिकू आदी फळांची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू झाली आहे. मागणी वाढताच काही व्यापाऱ्यांकडून फळे लवकर पिकवण्यासाठी घातक रसायनांचा वापर होत असल्याच्या घटना समोर येत आ–हेत. यावर आळा घालण्यासाठी अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाने कठोर भूमिका घेतली असून रसायनांचा वापर आढळल्यास संबंधितांवर थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
विशेषतः कॅल्शियम कार्बाईडसारख्या रसायनांचा



वापर करून फळे कृत्रिमरित्या पिकवली जा–तात. हा प्रकार अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा मानला जातो. यापुढे अशा प्रकारे फळे पिकवताना आढळल्यास व्यापारी, साठवणूकदार किंवा पुरवठादार यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार असून दंडासह कारावासाचीही तरतूद आहे.
अन्न सुरक्षा विभागाकडून फळबाजार, गोदामे तसेच विक्रेत्यांच्या ठिकाणी अचानक तपासण्या केल्या जाणार आहेत. संशयित फळांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जातील. दो–षी आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाईल.
तज्ज्ञांच्या मते, रसायनांनी पिकवलेल्या फळांचे सेवन केल्यास डोकेदुखी, चक्कर, उलट्या, पोटदुखी यांसारखे त्रास होऊ शकतात. दीर्घकाळ अशा फळांचे सेवन केल्यास मज्जासंस्था, श्वसनसंस्था आणि त्वचेवरही दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे.
दरम्यान, नागरिकांनी नैसर्गिकरित्या पिकलेली फळेच खरेदी करावीत व संशयास्पद फळांची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आरोग्य विभागाच्या बदलीत राजकीय दबाव आणल्यास शिस्तभंगाची कारवाई

**मुंबई :** सार्वजनिक आरोग्य विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापनात सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने गट–ब, गट–क आणि गट–ड कर्मचाऱ्यांसाठी नवे सर्वसमावेशक बदली धोरण लागू केले आहे. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे यापूर्वीचे विखुरलेले सर्व आदेश रद्द होऊन आता एकत्रित आणि स्पष्ट नियमावली अंमलात येणार आहे. १५ एप्रिल २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या या नवीन धोरणानुसार, बदल्यांची प्रक्रिया प्रामुख्याने 'समुपदेशन' (कौन्सिलिंग) पद्धतीने राबवली जाणार आहे. कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधी, पसंतीक्रम आणि प्रशासकीय निकड यांचा मेळ घालून हे निर्णय घेतले जातील. वर्षातील एप्रिल–मे महिन्यात सर्वसाधारण बदल्या केल्या जातील, तर विनंती बदल्यांसाठी सप्टेंबर आणि डिसेंबर असे दोन विशेष टप्पे निश्चित करण्यात आले आहेत.

# गौ–सन्मान विषयावर निवेदन मलकापूर येथे विप्र फाउंडेशनची मागणी



दैनिक निशस्त्र योध्दा

**मलकापुर:** येथे विप्र फाउंडेशनच्या वतीने गाईच्या सन्मान व संरक्षणासंदर्भात एक महत्त्वपूर्ण निवेदन आज दि.२७ एप्रिल २६ रोजी सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे गाईला ''राष्ट्रमाता'' दर्जा देण्याची आणि देशभरात गोहत्या पूर्णतः बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.
या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संस्कृती, शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत गाईचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे गाईला अधिकृतरित्या ''राष्ट्रमाता'' घोषित करावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच देशभरात गोहत्या तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.
याशिवाय, गोवंशाच्या संरक्षणासाठी शासनाने विशेष धोरण आखून त्यांना अनुदान व सुरक्षा देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. गोसेवा व गोसंवर्धनासाठी ठोस उपाययोजना राबविण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.
हे निवेदन विभागीय अधिकाऱ्यांमार्फत शासनापर्यंत पोहोचविण्यात आले असून, याची प्रत राष्ट्रपती आणि पंतप्रधान कार्यालयालाही पाठविण्यात आली आहे.
विप्र फाउंडेशन, मलकापूरच्या वतीने शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# लेखा परीक्षण खास अहवालाची चौकशी त्वरीत करा

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**मलकापुर:** ग्रामपंचायत च्या आर्थिक व्यवहाराचे दरवर्षी लेखा परीक्षण सहा संचालक लेखापरीक्षा विभागामार्फत करण्यात येते महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक पंरास २०१७/प्र. क्र. २६/ वित्त–९ दि. ८ जुन २०१७ नुसार शासनाने सर्व जिल्हा परिषदांना सूचित केलेले असून बुलढाणा जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने पृष्टांकन क्रमांक/बुजिप/साप्रवी/स्था–३/३२२३/२०२३ दि. १२/१०/२०२३ नुसार जिल्हा परिषदेच्या सर्व खाते प्रमुखांना व गटविकास अधिकारी यांना सदर परिपत्रकास प्रसिद्धी दिलेली असताना जिल्ह्यातील गटविकास अधिकारी सोडाच पण जिल्हा परिषदेचे काही खाते प्रमुख व त्यांचे कार्यालयीन सहकारी याबाबत अज्ञान दर्शवतात ही खेदजनक बाब आहे प्रत्येक विभागामध्ये शासनादेश फाईल ठेवण्यात येते त्यात येणारे शासन निर्णय परिपत्रक व वरिष्ठ कार्यालयाने प्रशासकीय कामकाजाबाबत दिलेल्या सूचना या संग्रही ठेवण्यात येतात परंतु बुलढाणा जिल्हा परिषद च्या प्रत्येक खाते प्रमुखांनी सदर नस्ती अद्यावत ठेवली नाही ही बाब अनेकदा पेन्शन अदालत मध्ये दिसून येते खास अहवाला बाबत शासनाने दिलेल्या सूचनांचा विचार केला असता त्यांनी त्या खालील प्रमाणे सुचवले आहेत.
१) अपहार किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये सहा महिन्याच्या आत संबंधित अपचारी कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध चौकशी करून प्रकरण निकाली काढण्यात यावे.
२) मयत झालेला लाभार्थी किंवा कर्मचारी वगळता इतर सर्वांकडून अपहारित रक्कम तातडीने वसूल करण्यात यावी.
अजूनही भरपूर सूचना दिलेल्या आहेत परंतु प्रशासनाला शासन आदेश व परिपत्रकानुसार कारवाईस वेळ नाही अशा प्रकारची माहिती जिल्हा परिषद सेवा निवृत्त कर्मचारी कल्याण समितीच्या वतीने अध्यक्ष प्रभाकर डुकरे व सरचिटणीस रमेश होले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.




